**ठळक बातम्या**

- बिहारच्या मतदार याद्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर संसदेच्या दोन्ही सभागृहात विरोधकांचा गदारोळ

- विरोधकांच्या गदारोळातच प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग विधेयक लोकसभेत सादर

- मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर ओसरला, इतरत्र अजूनही संततधार सुरु असल्यानं जनजीवन विस्कळीत

**आणि**

- राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सातारा इथं सुमारे १ कोटी २२ लाख रुपये किमतीचा प्रतिबंधित मद्यसाठा जप्त

**<><><><><>**

बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. आज सकाळी लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षांनी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी करत निदर्शनं सुरु केली. त्यामुळे सभापतींनी लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ लोकसभेत सादर केलं. ऑनलाईन गेमिंगमुळे होणारे दुष्परीणाम रोखणं, हे या विधेयकाचं उद्दीष्ट आहे. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ‘घटना दुरुस्ती विधेयक २०२५’, ‘केंद्रशासित प्रदेश सरकार विधेयक, २०२५; ‘जम्मू आणि

काश्मीर पुनर्रचना विधेयक', २०२५ लोकसभेत मांडलं. मात्र गदारोळ सुरुचं राहिल्यानं कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही काहीसं समान चित्र पहायला मिळालं. विविध राजकीय पक्षांकडून १८ स्थगन प्रस्ताव मिळाले असून हे प्रस्ताव फेटाळले असल्याचं, उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. उपसभापतींनी शून्य प्रहर पुकारला, मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी राज्यसभेचं कामकाज प्रथम दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राज्यसभेत IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक, २०२५ सादर केलं.

**<><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग विधेयक, २०२५ आज लोकसभेत मांडलं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देणं आणि त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार केली जाईल. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं. याद्वारे, अशा गेम्समध्ये फसवणूक होऊन नागरिकांवर, विशेषतः तरुणांवर होणारे सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि गोपनीयतेशी संबंधित दुष्परिणाम टाळायला मदत होईल.

**<><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी आज संसद भवनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा, किरेन रिजिजू यांसह भाजपचे अन्य नेते आणि रालोआतल्या घटक पक्षांचे खासदार उपस्थित होते. आपला अर्ज दाखल दाखल करण्यापूर्वी सी. पी. राधाकृष्णन यांनी यांनी संसद भवन संकुलातल्या प्रेरणास्थळावर भारताच्या विविध नेते आणि स्वातंत्र्यसैनिकांना पुष्पांजली अर्पण केली. उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पुढच्या महिन्याच्या ९ तारखेला होणार आहे. माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी हे इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत.

**<><><><>**

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर आज सकाळी सुरु असलेल्या जनसुनावणीदरम्यान हल्ला झाला. या आरोपीला पकडण्यात आलं असून, त्याची चौकशी सुरु आहे. दरम्यान रेखा गुप्ता यांची प्रकृती स्थिर असल्याचं दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेव यांनी सांगितलं आहे. भारतीय जनता पक्षानं या हल्ल्याचा निषेध केला आहे. तर दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आतिषी यांनीही या हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा तसंच आदोलन करण्याचा अधिकार आहे, मात्र कोणालाही हिंसा करण्याचा अधिकार नसल्याचं आतिषी यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली आहे. नवी दिल्लीत वीरभूमी इथं राजीव गांधी यांच्या समाधीवर कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, कॉंग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी पुष्पांजली वाहिली. संसदेच्या मध्यवर्ती सभागृहातही लोकसभेचे  सभापती ओम बिर्ला यांच्यासह इतर सदस्यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. मुंबईत राजभवनात देखील राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून त्यांना अभिवादन करण्यात आलं.

त्यानंतर सर्व उपस्थितांना सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात अधिकारी, कर्मचारी यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली.

<><><><><>

राज्यात मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर आज सकाळपासून ओसरू लागला आहे. मात्र अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कायम असल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातल्या राज्य आपत्ती नियंत्रण कक्षाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

**नवी मुंबई** क्षेत्राला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण १०० टक्के भरले आहे. आज पहाटे मोरबे धरणाचे दरवाजे २५ सेंटिमीटर उघडण्यात आले असून पाण्याचा विसर्ग धावरी नदीच्या पात्रात सोडण्यात आला आहे. नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये असं आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेनं केलं आहे.

**पालघर** जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू आहे. नालासोपारा, वसई, विरार भागात आज देखील सखल भागात पाणी साचलं असून अनेक भागातून नागरिकांना बाहेर काढून निवारा केलं आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर ओसरला असून धरणाच्या ७ स्वयंचलित दरवाजांपैकी ४ दरवाजे बंद झाले आहेत. अलमट्टी धरणाचा विसर्ग आज सकाळी ९ वाजल्यापासून वाढवला आहे.

**सातारा** जिल्ह्यात कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस वाढला आहे. कोयना धरणासह जिल्ह्यातली इतर धरणं ९५ टक्क्यांच्या वर भरली असून पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोयना नदीपात्रात विसर्ग सुरु आहे. सातारा शहरात काही रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले असून नागरिकांचं स्थलांतर केलं आहे.

**सांगली** जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला असला तरी कृष्णा नदी धोक्याच्या पातळीच्या वरूनच वाहत आहे. सांगलीतल्या काही भागातल्या नागरिकांना स्थलांतराच्या सूचना दिल्या आहेत.

**नाशिक**मध्ये काल रात्रीपासून पाऊस पुन्हा सुरू झाला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात संततधार सुरू असल्याने आज सकाळी आठ वाजल्यापासून गंगापूर, दारणा, इत्यादी अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. विसर्ग सुरू झाल्यानं गोदा काठालगत आठवडे बाजाराला प्रतिबंध केला आहे.

**अकोला** जिल्ह्यात काटेपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. काटेपूर्णा धरणाचे दहा दरवाजे उघडले असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**परभणी** जिल्ह्यात सेलु तालुक्यातल्या निम्न दुधना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे नद्या-नाल्यांचा पूर कायम आहे. भामरागड तालुक्यात राहणाऱ्या जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापकांचा पुरात वाहून गेल्याने मृत्यू झाला आहे. पुरामुळे राष्ट्रीय महामार्गासह ११ मार्गांवरील वाहतूक ठप्पच आहे. तेलंगणा राज्यातील मेडिगड्डा धरणातून गोदावरी नदीत मोठ्या प्रमाणात विसर्ग होत असल्याने सिरोंचा तालुक्याला पुराचा धोका वाढला असून, तेथे बचाव पथक तैनात केलं आहे.

राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज वाशिम जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली.

हवामान विभागाने उद्यासाठी **मुंबई, पालघर आणि रायगड** जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला असून **ठाणे, पुणे, नाशिक आणि सातारा** जिल्ह्याला रेड अलर्ट दिला आहे. राज्यातल्या अनेक नद्या धोक्याच्या पातळीच्या वरून वाहत असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. पूरपरिस्थितीमुळे

राज्यात गेल्या २४ तासांत १० जणांचा मृत्यू झाल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं सांगितलं आहे.

**<><><><>**

राज्यात प्रतिबंधित असलेला मद्यसाठा राज्य उत्पादन शुल्क विभागानं सातारा इथं जप्त केला, याची किंमत १ कोटी २२ लाख ७६ हजार २०० रुपये आहे. या प्रकरणी एकावर  गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट दारू तसंच हातभट्टी दारु होत असल्याचं निदर्शनास आलं तर त्याची माहिती देण्याची आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागानं केलं आहे.

**<><><><>**

बल्गेरियात सामोकोव्ह इथे सुरू असलेल्या २० वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताच्या सुमित मलिक यानं रौप्य पदक मिळवलं आहे. अंतिम फेरीत त्याला रशियाच्या मॅगोमेड ओडझामिरो याच्याकडून ५-८ असा पराभव पत्करावा लागला. महिला गटात सृष्टीने ६८ किलो गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तिने उपांत्य फेरीत जर्मनीच्या लॉरा कोहलर हिच्यावर ७-३ असा विजय मिळवला. तर ५७ किलो वजनी गटात तपस्या हिने जपानच्या सोवाका उचिदा हिला ४-३ असं पराभूत करून अंतिम फेरीत स्थान मिळवलं.

**//<><><><>//**